आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० एप्रिल २०२४ - मंगळवार

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज सोलापूर जिल्ह्यात माळशिरस इथं माढ्याचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. काँग्रेसनं प्रत्येक निवडणूकीत दिलेली गरीबी मुक्तीची आश्वासनं पाळली नसल्याची टीका त्यांनी केली. एनडीए सरकारने गेल्या दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरीबीतून बाहेर काढलं असल्याचं त्यांनी सांगितलं. माढ्याला पाणी देणार असल्याची आश्वासनं याआधीच्या नेत्यांनी पाळलेली नाही. सरकारनं गेल्या १० वर्षात निलवंडे धरणाचं काम पूर्ण केलं असून गोसीखुर्द धरणाचं कामही लवकरचं पूर्ण होईल असं मोदी यांनी सांगितलं. त्यानंतर अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ प्रधानमंत्री मोदी यांनी धाराशिवमध्ये सभा घेतली. कडधान्य आणि तेलबियांच्या उत्पादनात भारताला आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी म्हटलं.

भरडधान्याला जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प आणि जलयुक्त शिवार योजना काँग्रेसने थांबवल्या असल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या ५ वर्षांत एनडीए सरकारनं महाराष्ट्रातल्या ७५ लाखांहून अधिक घरांनी नळ जोडणीद्वारे पाणी दिलं असल्याची माहिती त्यांनी दिली. काँग्रेस कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे खोटे व्हिडिओ बनवत असल्याचा आरोप त्यांनी केला. लातूरमध्ये सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी मोदी यांची सभा सुरू आहे.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातले उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल शेवटचा दिवस होता. राज्यातल्या ११ मतदार संघांतल्या ७१ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली असून आता २९८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत अशी

माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली. येत्या १३ मे रोजी या टप्प्यातलं मतदान होणार आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी आज उत्तर मुंबई मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यापूर्वी गोयल यांनी शक्तिप्रदर्शन करणारी प्रचार फेरी काढली. उत्तर मध्य मुंबईतल्या काँग्रेस उमेदवार वर्षा गायकवाड देखील आज नामांकन पत्र दाखल करणार आहेत.

दरम्यान वायव्य मुंबईतून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून रविंद्र वायकर यांच्या नावाची घोषणा झाली आहे.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण जालना लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

भारतीय नौदलाचे प्रमुख म्हणून अडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांनी आज पदभार स्वीकारला. मावळते नौदलप्रमुख अडमिरल आर हरिकुमार यांच्याकडून त्यांनी सूत्र स्वीकारली. शांती च्या काळातही नौदलानं कोणत्याही धोक्याचा सामना करण्यासाठी सज्ज राहण्याची आवश्यकता असल्याचं अडमिरल त्रिपाठी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. देशाच्या

विकासाकरता तंत्रज्ञानातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल आवश्यक असल्याचंही ते म्हणाले.

<><><><>

**नांदेड** जिल्ह्यात भोकरहून नांदेडकडे जात असलेल्या भरधाव ट्रकने आठ दुचाकींना उडवल्याची घटना आज सकाळी बारडजवळ घडली. या घटनेत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले.

**नाशिक** जिल्ह्यातल्या चांदवडजवळ आज सकाळी एसटी बस आणि ट्रकमध्ये अपघात झाला. यात चार  जणांचा मृत्यू झाला असून ३३ प्रवासी जखमी झाले आहेत. राज्य परिवहन महामंडळाची बस चांदवड इथून नाशिककडे जात असताना एका ट्रकवर आदळली. या बस मध्ये ४५ प्रवासी होते.

<><><><>

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ११५व्या जयंतीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात तुकडोजी महाराजांच्या  प्रतिमेला  अभिवादन करण्यात आलं.

<><><><>

भारत आणि बांगलादेशात सुरू असलेल्या टी ट्वेंटी महिला क्रिकेट स्पर्धेच्या मालिकेतला दुसरा सामना आज बांगलादेशातल्या सिल्हट इथं होत आहे. दुपारी साडेतीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><>

आईपीएल क्रिकेट स्पर्धेत  लखनऊ सुपर जायंट्स आणि मुंबई इंडियंस यांच्यामध्ये लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर  आज संध्याकाळी साडेसात वाजता सामना होणार आहे.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतेक भागात उष्णतेची लाट आहे. नांदेड इथं काल दिवसभरातलं उच्चांकी तापमान ४२ अंश सेल्सियस नोंदलं गेलं. उष्णतेच्या प्रकोपापासून बचाव करण्यासाठी आवश्यक काळजी घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**//<><><><><>//**